बाह्य जीवसृष्टींची पृथ्वीवर ढवळाढवळ ?

विज्ञानवेधमधील गेल्या सदरात (किर्लोस्कर, एप्रिल १९८३) पृथ्वीबाहेर जीवसृष्टी असेल का, असली तर अतिप्रगत जीवसंस्कृतींची संख्या किती असेल, का आपण विश्वात एकटेच आहोत, इत्यादी प्रश्नांचा ऊहापोह केला होता. त्या चर्चेतील एक महत्त्वाचा मुद्दा असा होता, की जर आपली आकाशगंगा सभोवताली अतिप्रगत जीवसृष्टींनी व्याप्त असेल तर आजपर्यंत एखाद्या प्रगत संस्कृतीचे पृथ्वीवर आगमन का झाले नाही ?

आजकाल वृत्तपत्रांतून व नियतकालिकांतून कधी कधी असे लिखाण पाहायला मिळते. पृथ्वीवर काही अनाकलनीय घटना घडत आहेत– ज्यांमागे अशा परकीय जीवसृष्टींचा 'हात' आहे.असा त्याचा सूर असतो, अज्ञात उडत्या वस्तू (U. F. O. = Unidentified Flying Objects), बर्म्यूडा त्रिकोण आणि व्हॅन डॅनिकनची पुस्तके अशा लिखाणाला मीठमसाला पुरवतात. जरी हे सदर विज्ञानावर असले तरी 'वरील विषय विज्ञानसंमत आहे' हा गैरसमज दूर करायला हा लेख अवास्तव ठरणार नाही.



चित्र क्र. १

१) पॉल ट्रेंट यांनी घेतलेले अपरिचित उडत्या वस्तूचे छायाचित्र. हे बनावट असल्याचा आणि त्याचा ट्रेंट दम्पतीच्या हकीगतीशी मेळ बसत नसल्याचा पुरावा हळूहळू पुढे आला.

अज्ञात उडत्या वस्तू

अज्ञात उडत्या वस्तूची संज्ञा आकाशात दिसलेल्या अशा कुठल्याही उडणाऱ्या गोष्टीला दिली जाते– जिची ओळख पटू शकली नाही. एखाद्या वस्तूची ओळख पटली तर ती अ. उ. व.च्या सदरातून गळते. परंतु कुठल्याही ओळख न पटलेल्या वस्तूबद्दल ती 'परकियां'नी पाठवलेली आहे असे विधान करणे अशास्त्रीय ठरेल.

१९४७ मध्ये केनेथ आर्नोल्ड ह्या वैमानिकाला उडत्या तबकडया आपला पाठलाग करत आहेत असा भास झाला. त्याच्या वृत्तान्तामुळे उडत्या तबकडयांबद्दलच्या अहवालांना सुरुवात झाली. वातावरणात ९,५०० फुटांवर तपमान उंचीनुसार कमी होण्याचा क्रम उलटल्यामुळे आर्नोल्डला ते दृश्य दिसले, असे अमेरिकन हवाई दलाच्या तज्ज्ञांनी सांगितले. परंतु अ. उ. व. बद्दलच्या वाढत्या संख्येने येणाऱ्या अहवालांचा अभ्यास करण्यासाठी साइन, ग्रज व शेवटी ब्लू बुक ह्या प्रकल्पांखाली तज्ज्ञांच्या समितीने पुष्कळ वर्षे काम केले. ब्लू बुकची



चित्र क्र. २

२) दहा ते बारा वर्षे वयाच्या तीन भावंडांनी तयार केलेले अ. उ. व.चे बनावट छायाचित्र. छायाचित्राने कसे फसवता येते हे दाखवण्यासाठी त्यांनी मुद्दाम ही योजना केली. स्टायरोफोमचे लहान मॉडेल बारीक तारेने झाडाला टांगून हा फोटो घेतला आहे.



चित्र क्र. ३

३) रॉबर्ट शीफरने तयार केलेले बनावट छायाचित्र. ग्रामोफोन रेकॉर्ड उजेडाकडे तिरकी धरून फोटो घेतला की तिच्या भोकातून येणारा प्रकाश अ. उ. व.चा आभास निर्माण करतो.



चित्र क्र. ४ :

४) फ्लॉरिडा, पोर्टोरीको व बर्म्युडा ह्या तीन जागांना जोडणारा हा 'भयानक' त्रिकोण !

समिती १७ वर्षांच्या कामानंतर १९६९ मध्ये निर्वाण पावली. परंतु त्यांतून 'परकीय जीवसृष्टीकडून एखादे यान आले' असा निष्कर्ष असणारे एकही उदाहरण पुढे आले नाही.

उगवताना किंवा अस्ताला जाताना दिसणारे शुक्रासारखे ग्रह, आर्नोल्डला दिसलेल्याप्रमाणे वातावरणातले मृगजळ, पाहणाऱ्याची मानसिक स्थिती ठिकाणावर नसल्यामुळे त्याने दिलेल्या साक्षीची अविश्वसनीयता, मानवनिर्मित विमाने किंवा अंतराळयाने किंवा निव्वळ जाणूनबुजून केलेल्या फसवाफसवीचा प्रकार– अशी अनेक कारणे अ. उ. व. दिसण्यामागे असतात असे आतापर्यंतचा अनुभव सांगतो. मागे नमूद केल्याप्रमाणे (पाहा विज्ञानवेध–१२, किर्लोस्कर, फेब्रुवारी १९८३) अमेरिका-रशिया यांची हेरगिरी करणारी अंतराळयाने पृथ्वीभोवती फिरतात. त्यांतले एखादे दिसल्यास 'हे काय आहे ?' असा प्रश्न विचारल्यावर हे दोन्ही देश 'आम्हांला माहीत नाही' म्हणून कानावर हात ठेवणार. म्हणून अ. उ. व. सदरात मोडणारी प्रत्येक वस्तू खरोखर अपरिचित असते असे नाही.

फिलिप क्लास, रॉबर्ट शीफरसारखे काही सत्यशोधक मात्र अशा अ.उ.व. चा पाठपुरावा करून त्यामागचे रहस्य उकलून काढतात. चित्र क्रमांक-१ मध्ये दाखवलेले छायाचित्र ११ मे १९५० रोजी अमेरिकेतील ऑरेगॉन राज्यात मॅकमिनव्हिल गावी श्री. व सौ. पॉल ट्रेंट यांनी घेतलेले आहे. त्या दिवशी संध्याकाळी त्यांना आकाशात तबकडीसदृश वस्तू दिसली व पॉल ट्रेंट यांनी आतून कॅमेरा आणून ताबडतोब हे छायाचित्र घेतले. छायाचित्र काही खोटे बोलत नाही– तेव्हा हा पुरावा सबळ नव्हे का ?

छायाचित्र खोटे बोलत नाही– पण त्याचा उपयोग फसवायला केला जाऊ शकतो याचे हे उदाहरण आहे. ह्या छायाचित्राचा अभ्यास करून ते संध्याकाळी (सूर्यास्तसमयी) न घेता, सकाळी सूर्योदयाच्या वेळी घेतले आहे हे त्यातील घरावर पडणाऱ्या सावल्यांवरून सिद्ध करता आले. हवामानखात्याच्या नोंदीप्रमाणे त्या दिवशी संध्याकाळी आकाश स्वच्छ होते– पण सकाळी धुकट होते– जसे चित्रात आहे. आणि आकाशातली तबकडी ? आकाशात तबकडी दिसेल असा भास निर्माण करणारे दोन फोटो चित्रक्रमांक २ व ३ मध्ये पाहा !

फिलिप क्लास यांनी एक पैज मारली आहे. परकीय जीवसृष्टी कडून आकाशयान आले हे निर्विवाद सिद्ध करायला (आणि त्याकरता त्या पुराव्यावर अमेरिकेच्या राष्ट्रीय विज्ञान संस्थेचे शिक्कामोर्तब असले पाहिजे) त्यांनी १०,००० डॉलर्सचा पुरस्कार जाहीर केला आहे. मात्र जर तुम्ही हे आव्हान स्वीकारलेत तर तुम्ही दर वर्षी क्लास यांना १०० डॉलर (दहा वर्षांपर्यंत नाही तर पैज जिकेपर्यंत !) दिले पाहिजेत. अद्याप कोणीही पैजेचा विडा उचललेला नाही.

बर्म्युडा त्रिकोण

चित्रक्रमांक ४ मध्ये दाखवलेला त्रिकोण गेल्या काही वर्षांत बर्म्युडा त्रिकोण ह्या नावाने (कु)प्रसिद्ध झाला आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे चार्ल्स बर्लिझ यांची पुस्तके.

अटलांटिक महासागराच्या ह्या त्रिकोणी भागात आणि त्यावरील आकाशात काही चमत्कारिक शक्ती वास करीत असून त्यांच्यामुळे तेथे विमाने, जहाजे व माणसे अनाकलनीय पद्धतीने अदृश्य होतात किंवा नष्ट होतात असा बर्लिझचा दावा आहे. बर्लिझने कथन केलेल्या हकीगती वाचून वाचकाचा प्रथमदर्शनी (आणि फार विचार न केल्यास कायमचा !) ग्रह होतो की, ह्या त्रिकोणात नक्की काहीतरी अद्भुत घडत आहे. अरिझोना विद्यापीठातील पुस्तकालयात काम करणारे लॉरेन्स कुश यांनी मात्र ह्यातील बऱ्याच घटनांचा सखोल अभ्यास करून त्यांत अद्भुत तर नव्हेच, तर कित्येक बाबतीत तथ्यही नाही हे दाखवून दिले आहे.

अमेरिकेच्या समुद्रकिनाऱ्याजवळ १९७५ मध्ये २१ बोटी नाहीशा झाल्या, त्यांपैकी केवळ ४ बोटी बर्म्युडा त्रिकोणात गडप झाल्या. अमेरिकन भूभागावर जितक्या प्रमाणात विमाने अपघातात नष्ट होतात त्यापेक्षा पुष्कळ कमी प्रमाणात बर्म्युडा त्रिकोणावर होतात. बर्लिझने प्रस्तुत केलेल्या गोष्टी बऱ्याच वेळा अविश्वासार्ह लोकांच्या जबानीवर आधारलेल्या दिसतात.

उदाहरणार्थ, एका गोष्टीत ब्रूस जॅर्नान हा पामबीचमधला वैमानिक विमान चालवता चालवता एका ढगात घुसला आणि त्या ढगाने त्याला ताशी १००० मैल वेगाने उडवून त्याच्या मायामी बीच ह्या उद्दिष्ट जागी ठराविक वेळेपेक्षा अर्धा तास आधी आणून सोडले. ही हकीगत वाचनीय आहे– पण त्याला पुरावा काय ? विमान चालकाने निघण्यापूर्वी आपली उडण्याची योजना सादर करायची असते व पोचल्यावर ती पूर्ण झाल्याची नोंद करायची असते. परंतु ह्या दोनही नोंदी उपलब्ध नाहीत. केवळ वैमानिकाचा शब्द हाच पुरावा; आणि वैमानिक मुळातच बर्म्युडा त्रिकोण आणि उडत्या तबकड्यांवर विश्वास ठेवणारा.

परंतु जोपर्यंत जनसामान्यात अनाकलनीय घटना, चमत्कार इत्यादींबद्दल कुतूहल आहे तोपर्यंत ते शमवण्यासाठी खाद्य पुरवायला अशा हकीगती आणि अशी पुस्तके पुढे येत राहणार यात शंका नाही.

– जयंत नारळीकर